# शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

हत्तीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२

वेबसाईट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com


**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळा- परवानगी आदेश** जा.क्र.प्राथ/माध्य/उमा/कोवि/स्वंअशा/पर/१७-१८/ 20491-97

शासन निर्णय अनु. क्रमांक ० दिनांक - 30 AUG 2018

प्रति,

अध्यक्ष/सचिव

पाटणकर एज्युकेशनल ट्रस्ट,जुना शिरोड नाका,ता.सावंतवाडी,सिंधुदुर्ग.

विषय :- सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत- प्रथमिक/माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळा

संदर्भ -१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (म.शासन असाधारण४,६ व२४) २) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१८/प्र.क्र.३९३/एसएम-२,दि.१३ जून.२०१८.

उपरोक्त विषयी आपणांस कळविणेत येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे/विदयमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता प्रस्ताव सादर केला होता. त्याप्रस्तावानुसार संस्थेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणे/विदयमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता खालील अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी देणेत येत आहे.

शाळेचा प्रकार प्राथमिक ते माध्यमिक(इ.१ ली ते १० वी)

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/दर्जावाढ | मंडळ संलग्नता | परवानगी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पाटणकर एज्युकेशनल ट्रस्ट,जुना शिरोड नाका,ता.सावंतवाडी,सिंधुदुर्ग. | द स्टेपिंग स्टोन ग्लोबल स्कुल,निरुखे, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग. | इंग्रजी | नवीन | सी.बी.एस.ई | २०१८-१९ |

1) शाळा परवानगी साठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

2) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजणेत येईल.

3) या अधिनियमातील तरतूदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष२०१८-१९ पासून असेल.

4) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग सुरु करता येणार नाहीत.

5) परवानगी मिळाल्यापासून 18 महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रददबातल ठरेल.

6) परवानगी देणेत आलेल्या नवीन/दर्जावाढ शाळा यांना केंद्र व राज्य शासनाचे शिक्षण विषयक अधिनियम, नियम, वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील सर्व तरतदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

7) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/दर्जावाढ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

8) महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांचे अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

9) महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना युडाएस मध्ये माहिती भरताना स्वंयअर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

10) नवीन/दर्जावाढ शाळामध्ये शासन निर्णय दि. 29/6/2013 नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. या शाळांच्या संदर्भात आर.टी.ई. ॲक्ट 2009 मध्ये नमूद केलेल्या सर्व मानकांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

11) शाळेमध्ये आकारणेत येणारे शैक्षणिक शुल्क प्रचलित नियम तसेच वेळोवेळी होणा-या सुधारीत नियमानुसार आकारणेत यावे. तथापि, सदरचे शैक्षणिक शुल्क अवाजवी असू नये. नियमबाहय शुल्क आकारणी केलेस योग्य ती कारवाई करणेत येईल.

**शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**
हत्तीमहाल, सोमवार पेठ, गंजी गल्ली कोल्हापूर ४१६००२
वेबसाइट www.dydekop.org.in ईमेल dydekop@gmail.com

12) अधिनियमातील तरतूदीनुसार संस्था वरील वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास कायमपणे आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहीजे. या वर्गाना कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी दिली असलेने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देणेत येणार नाही.

13) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहीजे.

14) शासनाने वेळावेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहीजे. तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधिका-याकडून मान्यता घेतली पाहीजे. तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहीजे.

15) संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे तसेच शासन निर्णय दि. 29/6/2013 मध्ये दिलेल्या मूलभूत सुविधांच्या निकषांची पूर्तता असणे आवश्यक आहे.

16) संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अमलबजावणी केली पाहीजे. तसेच अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहीजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहीजेत.

17)संस्थेने शाळेतील विदयार्थ्यासाठी /कर्मचा-यासाठी विहित नोंदवहया अदयायावत व विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहीजेत.

18)संस्थेने /शाळेने आर.टी.ई. ॲक्ट 2009 , माध्यमिक शाळा संहिता, म.खा.शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली 1981 मधील तरतूदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

19) शासन निर्णय दि. 3/11/2009 नुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डिंग कोडनुसार असणे आवश्यक आहे.

20) सदर शाळेस सक्षम प्राधिका-याकडून (शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक, शिक्षण उपसंचालक) यांचेकडून प्रथम मान्यता प्राप्त झालेनंतर शाळेने ज्या अभ्यासक्रम मंडळाशी संलग्न होण्यासाठी या अधिनियमांतर्गत परवानगी मागणी केलेली असेल त्या अभ्यासक्रम मंडळ संलग्नतेसाठी प्रचलित नियमानुसार विहित नमुन्यात व कार्यपध्दतीनुसार शिक्षण उपसंचालक यांचेकडे अर्ज करेल. सीबीएसई, आयसीएसई इ. शिक्षण मंडळाशी संलग्न होवू इच्छिणा-या शाळाना शासन निर्णय दि. 20/6/2012 नूसार विहित नमून्यात नाहरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडे अर्ज करावा लागेल.

**21) संस्थेने दाननिधी संस्था व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचे संयुक्त नावे ठेवावा. प्रथम मान्यता प्रस्ताव सादर करताना दाननिधीची मूळ ठेव पावती शिक्षणाधिकारी ( प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे जमा करावी. शिक्षणाधिकारी यांनी सदरची मूळ ठेव पावती जतन करुन ठेवावी व आवश्यकतेनुसार संबंधिताकडून ठेव पावतीचे नूतनीकरण करुन घेणेत यावे. सदर दाननिधी पावती राष्ट्रीयकृत बँकेमाध्ये किमान 3 वर्ष मुदतीची ठेव पावती असणे आवश्यक आहे.**

22) महाराष्ट्र स्वंयअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळाना सदर नियमांतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतूदींची तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व माध्यमिक शाळा संहिता मधील 3.2 नुसार शाळा मान्यतेच्या तरतूदींची पूर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा प्रथम मान्यतेकरीता प्रस्ताव 1 महिन्याच्या आत विहित नमुन्यात सक्षम अधिका-याकडे (प्राथमिक शाळेबाबत शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेबाबत शिक्षण उपसंचालक तसेच मनपा क्षेत्रातील शाळांसाठी प्रशासन अधिकारी,मनपा) सादर करणे आवश्यक राहील. मुदतीत प्राप्त न झालेल्या

शासन निर्णय अनु. क्रमांक

( किरण लोहार )
प्र. शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर-
मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई 32
मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक/प्राथमिक) शिक्षण संचालनालय, म.रा पुंणे
अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक यांना माहिती व कार्यवाहीसाठी **पाटणकर एज्युकेशनल ट्रस्ट,जुना शिरोड नाका,ता.सावंतवाडी,सिंधुदुर्ग.**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
सदर शाळा संबंधित संस्थेने सुरु केल्यानंतर 1 महिन्याच्या आत तपासणी करुन त्याचा तपासणी अहवालास अनुसरुन प्रथम मान्यतेबाबतची कार्यवाही ठेवणेत यावी. माध्यमिक व उच्च माध्यमिकचे प्रस्ताव या कार्यालयास प्रथम मान्यतेसाठी सादर करावेत